प्रेसनोट –

दत्तवाडी पो.स्टे.पुणे
दिं. १६/११/२०१७

## देशी बनावटीचे पिस्टलसह दोन युवक जेरबंद

दिं.१७/११/२०१७ रोजी दत्तवाडी पो. स्टे. कडील पो. शि. विकास कदम यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, "दोन इसम एकाच्या अंगात निळया काळया रंगाची पॅन्ट व निळया रंगाचा शर्ट व पायात काळया रंगाचे बुट घातलेले आहेत. दुसरा इसमाच्या अंगात पांढ-या रंगाचा शर्ट व निळया रंगाची जिन्स पॅन्ट दोघांचीही दाढी वाढलेली असुन त्यांच्याकडे देशी बनावटीचे पिस्टल असुन, ते घेवुन विकणेसाठी जनता वसाहत येथील जनता चौक येथे येणार आहेत." अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदरची बातमी वरिष्ठांना कळवुन त्यांचे आदेशाने पोलीस उपनिरिक्षक डफळ यांनी स्टाफसह जनता चौक सांस्कृतीक हॉल समोर जनता वसाहत पर्वती पुणे येथे जावुन सापळा रचुन बातमीत मिळालेल्या वर्णनाचे दोन इसम जनता चौक सांस्कृतीक हॉल समोर थांबलेले दिसल्याने वरील स्टाफने दिं १७/११/२०१७ रोजी २१/०० वा. जागीच पकडले. तेव्हा त्यांना त्यांची नावे पत्ते विचारता त्यांनी आपली नावे **१.** विशाल बंडू गवळे वय २४ वर्षे धंदा ड्रायव्हर रा. जनता वसाहत पर्वती पुणे. **२.** रवि अंगत चव्हाण वय २० वर्षे धंदा इलेक्ट्रीशियन रा. सदर असे सांगितलेनंतर त्यांची झडती घेता आरोपी विशाल बंडू गवळे याच्या कंबरेला डाव्या बाजूला पॅन्टच्या आत मध्ये खोसलेली एक देशी बनावटीची पिस्टल किं.रू ३०,०००/- रुपये मिळून आले. व आरोपी रवि अंगत चव्हाण याच्या पॅन्टच्या उजव्या खिशात एका लहान प्लस्टिकच्या पिशवीमध्ये दोन जिवंत पितळी राऊंड किंमत २००/- रुपये मिळून आले. असा एकुण ३०२००/-रू चा माल मिळून आला असुन त्यांचे विरुध्द दत्तवाडी पो. स्टे. येथे गु. रं. नं. ३६५/२०१७ भारताचा हत्याराचा कायदा कलम ३(२५). मुं. पोलीस ॲक्ट कलम ३७ (१) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करणेत आला असुन सदरची कारवाई ही मा. डॉ. प्रविण मुंढे मा.पोलीस उप-आयुक्त सो परि-२, मा. डॉ शिवाजी पवार सहा.पोलीस आयुक्त सो, स्वारगेट विभाग पुणे शहर, मा.वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री अनिल पाटील सो व पोलीस निरीक्षक (गुन्हे) कृष्णा इंदलकर सो यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकातील पोलीस उप-निरीक्षक श्री डफळ, पो. हवा. तानाजी निकम, पो. ना. सुधीर घोटकुले, पो. ना. महेश गाढवे, पो. शि. विकास कदम, पो शि रोहन खैरे, पो. शि. सागर सुतकर, पो. शि. शरद राऊत व पो. शि. राहुल ओलेकर यांनी केली आहे. तसेच दाखल गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक महेश गाढवे हे स्वतः करीत आहेत.